व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहारबाबत सखोल चौकशी करण्यासाठी गठीत चौकशी समितीस दोन महिन्यांची मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : व्यशिअ-२०१५/(३८७/१५)/व्यशि-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: १७ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ:- १) कौ.वि.व उ.विभाग शा.नि.क्र.व्यशिअ-२०१५/(३८७/१५)/व्यशि-१, दि.२९.११.२०१७
२) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सदस्य सचिव चौकशी समिती यांचे क्रमांक उपसंचालक दालन/खरेदी/२०१७-१८/ चौकशी समिती/०३/२०१८, दि.१६.१.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना:

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमितता व आर्थिक भ्रष्टाचार तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock -१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहारबाबत सखोल चौकशी करण्यासाठी संदर्भ क्र. १ येथील दि.२९.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अप्पर मुख्य सचिव (उद्योग) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीस त्यांचा अहवाल दोन महिन्यात सादर करावा असे आदेशीत केले आहे. तथापि, सदर समितीचे सदस्य सचिव तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १६.१.२०१८ च्या पत्रान्वये सदर चौकशी समितीच्या कामकाजाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत शासनास विनंती केली होती. त्या अनुषंगाने चौकशी समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

शासन आता याद्वारे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (उद्योग) उद्योग, उर्जा

व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २९.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीस या संदर्भातील चौकशी करुन अहवाल सादर करणेसाठी या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदतवाढ देत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०२१७१५०६३९२२०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.02.17 15:10:25 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) उपसंचालक, (मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना), उद्योग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
४) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (खरेदी प्रक्रिया विषयाशी संबंधित), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३) मा.सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.
६) उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.
८) निवड नस्ती (व्यशि-१).